क्रमांक : १८३२७ /ई-१
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय
विधान भवन, मुंबई.
दिनांक : २५ ऑगस्ट, २०२२

**:: परिपत्रक ::**

विषय : **महाराष्ट्र विधानपरिषदेचे सन २०२२ चे व्दितीय (पावसाळी) अधिवेशनातील तारांकित स्वीकृत प्रश्न फेरविचारांती अतारांकित स्वीकृत केल्याबाबत...**

संदर्भ : **या सचिवालयाचे परिपत्रक क्र.१२६५८/ई-१, दिनांकित १६ जून, २०२२**

महाराष्ट्र विधानपरिषद कामकाज सल्लागार समितीच्या गुरुवार, दिनांक ११ ऑगस्ट, २०२२ रोजीच्या बैठकीत घेतलेल्या निर्णयानुसार महाराष्ट्र विधानपरिषदेचे पावसाळी अधिवेशन, बुधवार, दिनांक १७ ऑगस्ट, २०२२ ते गुरुवार, दिनांक २५ ऑगस्ट, २०२२ या कालावधीत आयोजित करण्यात आले आहे.

महाराष्ट्र विधानपरिषदेच्या पूर्वनियोजित व्दितीय (पावसाळी) अधिवेशनाकरिता संदर्भाधीन परिपत्रकातील विवरणपत्रामध्ये दर्शविलेले गट क्र. १ चे दिनांक २५ जुलै, २०२२, गट क्र. २ चे दिनांक २६ जुलै, २०२२ व गट क्र. ५ चे दिनांक २२ जुलै, २०२२ व दिनांक २९ जुलै, २०२२ रोजीचे सर्व तारांकित स्वीकृत प्रश्न विभागाकडे यापुर्वीच पाठविण्यात आले आहेत. तथापि, कामकाज सल्लागार समितीच्या बैठकीत घेण्यात आलेल्या निर्णयानुसार विद्यमान अधिवेशनाचा कालावधी एक आठवड्याचा निश्चित करण्यात आला आहे.

मा.उप सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांनी दिलेल्या निदेशानुसार गट क्र. १ चे दिनांक २५ जुलै, २०२२, गट क्र. २ चे दिनांक २६ जुलै, २०२२ व गट क्र. ५ चे दिनांक २२ जुलै, २०२२ व दिनांक २९ जुलै, २०२२ रोजीचे सर्व तारांकित स्वीकृत प्रश्न आता फेरविचारांती अतारांकित स्वीकृत करण्यात आले आहेत. उक्त सर्व प्रश्नांची उत्तरे महाराष्ट्र विधानपरिषद नियम ७० (२) अन्वये प्रश्न शासनास मिळाल्याच्या दिनांकापासून तीस दिवसाच्या आत या सचिवालयास पाठविण्यात यावीत.

(राजेश तारवी)
उप सचिव,
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

प्रति,

(१) मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव
(२) मा.उप मुख्यमंत्री यांचे सचिव
(३) मा.मंत्री व मा.राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव
(४) सर्व मंत्रालयीन विभाग, मंत्रालय, मुंबई
यांना माहितीसाठी तथा कार्यवाहीसाठी अग्रेषित